# महाराष्ट्र शासन

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं. 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com**


जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2426/2024-25 **दिनांक :- 25/09/2024**

# -:परिपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), संघ लोकसेवा आयोग (UPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, स्टाफ सिलेक्शन कमिशन, आय.बी.पी.एस. बॅंकींग परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2024-25 करीता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेचे निकाल जाहीर करण्याबाबत.**

सन 2024-25 या आर्थिक वर्षात महाज्योती, मार्फत राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), संघ लोकसेवा आयोग (UPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, स्टाफ सिलेक्शन कमिशन, आय.बी.पी.एस. बॅंकींग परीक्षा पुर्व प्रशिक्षणांकरीता विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता चाळणी परीक्षा खालीलप्रमाणे घेण्यात आलेली आहे.

| अ.क्र | प्रशिक्षणाचे नाव | चाळणी परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | IBPS-PO/LIC/Railway/Banking परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.31/07/2024 |
| 2 | केंद्रीय कर्मचारी निवड आयोग (SSC-CGL) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.01/08/2024 |
| 3 | संघ लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.10/08/2024, दि.11/08/2024 & दि.12/08/2024 |
| 4 | महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.12/08/2024, दि.13/08/2024 & दि.14/08/2024 |
| 5 | महाराष्ट्र लोकसेवा आयोग अभियांत्रिकी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.14/08/2024 |
| 6 | महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट ब व क परीक्षा पूर्व प्रशिक्षण | दि.14/08/2024 & दि.16/08/2024 |

सदर प्रशिक्षणांकरीता प्रशिक्षण संस्था निवडण्याची प्रक्रिया ही स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण अंमलबजावणी व संनियंत्रण समिती मार्फत करण्यात येत आहे. परंतु महाज्योतीच्या संचालक मंडळाने सदर समितीच्या कामकाजाबाबत विविध तक्रारी उद्भवल्यामुळे याची दखल घेवून सदर प्रक्रियेमधुन बाहेर पडण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. सदर मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर प्रशिक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

मात्र MBA-CAT/CMAT-CET परीक्षा पुर्व प्रशिक्षण व UGC-NET/CSIR/MH-SET 2024-25 परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या काही विद्यार्थ्यांची MPSC, UPSC च्या प्रशिक्षणासाठी ही

निवड होऊ शकते. त्यामुळे कोणत्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घ्यायचा याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम असल्याची बाब महाज्योतीच्या निदर्शनास विद्यार्थ्यांनी आणून दिलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घ्यावयाचा आहे, याची स्पष्टता यावी या कारणाने प्रारुप निवड यादी या परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर प्रारुप निवड यादी ही अंतिम नाही. गुणांकन करताना अवलंबिण्यात आलेली प्रक्रिया याआधीच दि.05/09/2024 रोजीच्या परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात आलेली आहे. सुलभ संदर्भासाठी परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

तसेच प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या प्रारुप निकालात कुठल्याही प्रकारचे आक्षेप असल्यास विद्यार्थ्यांना महाज्योतीच्या mahajyotihelpdesk@gmail.com या ई-मेल आयडी वर आक्षेप नोंदविण्याची संधी दि.01/10/2024 रोजी पर्यंत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याबाबत काही वैध आक्षेप प्राप्त झाल्यास त्याचे योग्य निराकरण करुनच निवड यादी अंतिम करण्यात येईल, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या प्रशिक्षण संस्थेस रुजु व्हायचे आहे, याबाबत शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर स्वतंत्रपणे परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

(स्वा.)
राजेश खवले
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर